MHAU080003202020

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २८.०१.२०२० |
| नोंदणी दिनांक | : | २८.०१.२०२० |
| निकाल दिनांक | : | १३.०८.२०२६ |
| कालावधी | : | ०६ व.०६ म.१६दि. |

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १२७/२०२०. नि.क्र.१० लगत.

| प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सिल्लोड, ता. सिल्लोड, यांचे न्यायालय<br>(पिठासीन अधिकारी – ए. एच. तट्टु)<br>(पारित दिनांक – १३ ऑगस्ट, २०२६) | |
|---|---|
| गु.र.क्र.३३७/२०१९ (पोलीस स्टेशन सिल्लोड ग्रामीण, ता.सिल्लोड जि. औरंगाबाद)<br>मुंबई दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे | |
| अभियोगपक्ष | **महाराष्ट्र सरकार, तर्फे**<br>**पोलीस निरीक्षक,**<br>**पोलीस ठाणे,सिल्लोड ग्रामीण ता.सिल्लोड जि. औरंगाबाद.** |
| सरकारतर्फे | श्री. जी.बी.कदम, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **प्रकाश धोंडीराम कांबळे ,**<br>वय – ४९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा.– डोंगरगाव, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर. |
| आरोपीतर्फे | विधिज्ञ श्री.एस.जी.बोराडे. |

**भाग–ब**

(फौजदारी प्रक्रिया संहिता प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

13/08/26

| | |
|---|---|
| गुन्हा दिनांक | २७.१२.२०१९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २८.१२.२०१९ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | २८.०१.२०२० |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १३.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव दिनांक | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | १३.०८.२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असेल | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीचा तपशील

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली किंवा मुक्त केले | किती शिक्षा झाली | पूर्वी तुरूंगात असल्यास तो काळ वजा केलेला असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकाश धोंडीराम कांबळे | फौ.प्र.सं.,१९७३ कलम ४१ (अ) (१) प्रमाणे नोटीस | -- | ६५ (ई) मुंबई मद्यनिषेध कायदा | निर्दोष मुक्त केले | -- | --- |

## भाग–क

(फौजदारी प्रक्रिया संहिता प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)

**अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

### अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार

| **साक्षीदार क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|
| सा. क्र. १ | राजु बालाजी शेवाळे | जप्ती पंचसाक्षीदार |

### आरोपीच्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### अभियोगपक्षाने दाखल केलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### आरोपीस मान्य असलेले दस्ताऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

13/8/20

## आरोपीने दाखल केलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायालयाने स्वतःहुन दिलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## आर्टिकल / चीजवस्तू

| अ.क्र. | आर्टिकल क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक १३ ऑगस्ट,२०२६)

आरोपी महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा,१९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दंडनीय अपराध केलेचे आरोपावरुन चालविण्यात आलेल्या संपरिक्षेस सामोरा जात आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–**

**२.** श्री. दिपक आनंदा इंगळे, पो.ना./९६० नेमणूक सिल्लोड ग्रामीण पोलीस स्टेशन, यांनी घटनेची फिर्याद दिली. दिनांक २७.१२.२०१९ रोजी कर्तव्यावर हजर असताना मिळालेल्या गुप्त बातमीवरून त्यांनी स्वतः, व दोन पंच व इतर सहका–यांसह

Afaury
13/8/26

२१.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे डोंगरगाव गावाता तुमच्या राहत्या घरात व छपरात चुलीच्या जवळ खड्यात येथे आरोपीने याने त्याच्या घराच्या लगत ताब्यात प्रोहीबीशन गुन्ह्याचा माल विक्रीसाठी लपवून ठेवला आहे. त्यावरुन छापा मारला असात देशी दारुची चोरटी विक्री करतांना मिळून आला व आरोपीची चौकशी करून पिशवीची झडती घेतली असता तेथे देशी भिंगरी संत्रा दारूच्या १८० मि.ली. च्या १६ बाटल्या मिळून आल्या. त्यानंतर पंचनामा तयार केला. सदर ठिकाणी मिळून आलेल्या मुद्देमालातून १८० मि.ली. क्षमतेची देशी दारुची एक सिलबंद बाटली नमुना तपासणीसाठी काढून घेतली. उर्वरित सर्व मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेतला. त्यानंतर आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण यांनी गुन्हा क्र.३३७/२०१९ नोंदविला. तपासी अधिकारी यांनी प्रकरणाचा तपास केला व आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे त्याचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी दिनांक २८.०१.२०२० रोजी आरोपी विरुध्द महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये आरोप निश्चित करुन आरोपीला मराठीत वाचून दाखविले. आरोपीने आरोप नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली. खोटा खटला दाखल केलेचा आरोपीने बचाव घेतला आहे. अभिलेखावर आरोपीविरुध्द कोणताही पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप, त्या अनुषंगाने सरकार पक्षाने

13/8/20

सादर केलेला तोंडी व लेखी पुरावा, त्यास आरोपीने घेतलेला बचाव इत्यादीवरुन खालील मुद्दे माझे विचाराधीन आलेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह त्यापुढे नमुद केलेले आहेत.

| अ. नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, आरोपीने दिनांक २७.१२.२०१९ रोजी २१.०१५ वाजण्याच्या सुमारास मौजे डोंगरगाव ता. सिल्लोड येथे राहत्या घरात बाजुला बिगर परवाना, देशी भिंगरी दारुच्या १८० मि.ली. च्या एकूण १६ सिलबंद बाटल्या स्वतःच्या अर्थिक फायद्याकरीता विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असताना मिळून आला, आणि म्हणून त्याने मुंबई मद्यनिषेध कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेला दोषारोप शाबीत करण्यासाठी पंच साक्षीदार राजु बालाजी शेवाळे (साक्षीदार क्र.१) यांची साक्ष निशाणी क्र.१० खाली नोंदविलेली आहे.

**मुद्दा क्र. १ करीताः-**

13/8/25

७. अभियोग पक्षातर्फे पंचनामा शाबित करयासाठी पंच साक्षीदार राजु बालाजी शेवाळे (साक्षीदार क्र.१) यांची साक्ष नोंदविलेली आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये पंचनाम्यावरील कोणताही मजकूर मान्य केलेला नाही. अभियोग पक्षाने उत्तर सूचक प्रश्न विचारले असता त्यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिलेली आहेत.

८. अभियोग पक्षाने फिर्यादी व तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. साक्षीदार क्र.१ हे पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केलेले नाही तसेच तपासी अधिकारी यांच्या साक्षे अभावी पंचनामा सिध्द होवू शकला नाही. त्यामुळे प्रकरणातील घटना तसेच छापा व जप्तीबाबत साशंकता निर्माण होते.

९. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, जप्त केलेला मुद्देमाल रासायनिक विश्लेषणाकरीता वैज्ञानिक प्रयोगशाळा, औरंगाबाद यांनी रासायनिक विश्लेषण अहवाल खटल्यामध्ये दाखल केला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात मिळालेला माल हा दारु होती, असा निष्कर्ष काढता येत नाही. सरकार पक्षाच्या एकंदरीत पुराव्यावरुन आरोपीने त्याच्या ताब्यामध्ये स्वतःच्या फायद्याकरीता देशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगली असे निःसंशयपणे सिध्द झालेले नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीताः</u>–**

१०. वरील चर्चेअंती हे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष या खटल्यातील जप्ती पंचनामा शाबीत करु शकलेला नाही. अभियोग पक्ष आरोपीच्या ताब्यात देशी दारुच्या बाटल्या मिळालेचे ठोसपणे शाबीत करु शकलेला नाही. त्यामुळे आरोपीने त्याच्या

आर्थिक फायद्याकरीता विनापरवाना देशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगली असा जो दोषारोप ठेवण्यात आलेला आहे. तो निःसंशयपणे शाबीत होत नाही. त्यामुळे वरील विवेचनावरुन व निष्कर्षावरुन मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपीची महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचा वैयक्तिक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

**३.** पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपील कालावधी संपल्यानंतर, जप्त मुद्देमाल म्हणजे देशी दारुच्या सिलबंद बाटल्या ह्या कायदेशीरमार्गे विल्हेवाट लावाव्यात.

**४.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार रुपये १५,०००/- चे प्रत्येकी जामीन बंधपत्र सादर करावे.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. )

13/8/26

**(ए.एच.तट्टु)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, सिल्लोड.

दिनांकः १३.०८.२०२६